## निशाणी क्र.१९ वरिल आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफियत दाखल करण्यास परवानगी करीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी याचे अर्जातील कथन की, प्रस्तुतचा दावा अतिक्रमण काढुन ताबा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दि. ०७/११/२०२२ रोजी दाव्याचे समन्स प्राप्त झाले. प्रतिवादी क्र. ९ हे आजारी असुन अंथरुणावर पडुन आहे. प्रतिवादी क्र. १० हे बाहेर गांवी गेलेले होते, प्रतिवादी क्र. ११ हे मलकापुर येथे राहतात त्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करता आलेली नाही. त्यामुळे १८२ दिवसाचा विलंब झालेला आहे. सदर विलंब जाणुनबुजुण केलेला नाही. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर शामिल न केल्यास नुकसान होणार आहे. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही त्यामुळे कैफियत दाखल करण्यात झालेला विलंब माफ करुन विनाकैफियत चौकशीचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर खुलासा देवुन सदर अर्जामध्ये तथ्य नाही त्यामुळे नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादीतर्फे युक्तिवाद ऐकला परंतु, प्रतिवादी यांना युक्तिवाद करण्याची संधी देवुनही युक्तिवाद केला नाही. प्रस्तुतचा अर्ज ब-याच दिवसापासुन प्रलंबित असल्यामुळे निकाली काढण्यासाठी हाती घेण्यात आला. अर्जाचे व अभिलेखांचे सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव व अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांना दाव्याचे समन्स प्राप्त होवुन प्रस्तुत खटल्यामध्ये हजर झाले परंतु, मुदतीत आपली कैफियत सादर केलेली नाही. प्रतिवादी क्र. ९ याच्या वैद्यकीय उपचाराबाबतचे कागदपत्र अभिलेखावर सादर केलेले नाही. तसेच प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्याबाबत दिलेले कारण संयुक्तिक नसल्याचे स्पष्ट होते.

५. परंतु, प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव व अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी असल्यामुळे प्रतिवादी यांचे मौल्यवान हक्क हितसंबंध दाव्यामध्ये गुंतलेले आहेत. प्रस्तुत खटल्यामध्ये अद्यापपर्यंत पुराव्यास सुरुवात झालेली नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी क्र. ९ ते ११ यांना आपली बाजु मांडण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. परंतु, प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबा बाबत खर्चाचे आदेश पारित करुन अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## आदेश

अ. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/– खर्चाचे आदेश पारित करुन मंजुर करण्यात येतो.

ब. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी याने वादी यांना पुढील तारिख किंवा त्यापुर्वी अदा करावयाचे आहे.

क. प्रतिवादी यास कैफियत दाखल करण्यास झालेला १८२ दिवसांचा विलंब माफ करण्यात येवुन कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

स्वा/– xxx

दिनांक २८/०६/२०२४

(ए.एच.शेख)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क–स्तर,
अकोट.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order

| | |
|---|---|
| Name of Steno | : R.C.Bajpai. |
| Name of Court | : A. H. Shaikh<br>2nd Jt. Civil Judge, J. D., Akot. |
| Date of Judgment | : 28/06/2024. |
| Judgment signed by P.O. on | : 28/06/2024. |
| Judgment uploaded on | : 28/06/2024. |